राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**क्रमांक-रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १६ जानेवारी, २०१२.**

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही उमेदवार, राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये वर्तमानपत्रामधील बातम्यांच्या स्वरुपात आपली जाहिरात करतात. या जाहिरातीचे दृश्य स्वरुप जरी बातमीसारखे असले तराही प्रत्यक्षात प्रसारमाध्यमांना किंमत देऊन अशा बातम्या छापून आणल्या जातात. (अशा बातम्यांना पेड न्यूज असे संबोधण्यात येते) छापील प्रसारमाध्यमांद्वारे (Print Media) देण्यात येणा-या अश्या जाहिरातींबाबत कोणती कार्यवाही करावी याबाबत कार्यपध्दती ठरविणे आवश्यक आहे.

२. आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता उमेदवारांनी करावयाच्या खर्चावर राज्य निवडणूक आयोगाने निर्बंध घातले असून निवडणूक लढविणा-या उमेदवाराने राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्यास अशा उमेदवारास अनर्ह ठरविण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत.

३. आणि ज्याअर्थी, पेड न्यूज या सदराखाली मोडणा-या जाहिराती / बातम्या यावर होणारा खर्च कुठेही दर्शविला जात नाही आणि त्यामुळे हा खर्च निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट होत नाही. ही बाब ध्यानी घेता पेड न्यूजसंदर्भात येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिकानिहाय अथवा जिल्हानिहाय समितीचे गठन करणे आवश्यक आहे.

४. आणि त्याअर्थी, महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने छापील प्रसार माध्यमांवर देण्यात आलेल्या पेड न्यूजच्या संदर्भात आलेल्या तक्रारींवर चौकशी करून निर्णय घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. त्या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल -

**महानगरपालिका निवडणुकांकरिताची समिती**

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका आयुक्त | अध्यक्ष |
| २. | संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | महानगरपालिका आयुक्तांनी नेमलेला महानगरपालिकेतील उपायुक्त दर्जाचाअधिकारी | सदस्य |
| ४. | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ५. | प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचा नामनिर्देशित प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | संबधित प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी | सदस्य |
| ७. | महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी | सदस्य-सचिव |

**नगर परिषद/नगर पंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांकरिताची समिती**

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | जिल्हाधिकारी यांनी नेमलेला जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर/उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी | सदस्य |
| ४. | प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचा नामनिर्देशित प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | संबंधित प्रभागाचे, मतदार विभाग/निर्वाचक गण यांचे निवडणूक निर्णय अधिकारी | सदस्य |
| ६. | संबंधित तहसिलदार अथवा नगर परिषदेचे मुख्याधिकारी | सदस्य |
| ७. | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य-सचिव |

५. महानगरपालिकेच्याबाबतीत संबंधित महानगरपालिकेतील माहिती व जनसंपर्क अधिकारी यांच्याकडे याबाबतीतील सर्व कागदपत्रे राहतील. नगर परिषद/नगर पंचायत, जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणुकांच्याबाबतीत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे याबाबतीतील सर्व कागदपत्रे राहतील.

## ६. पेड न्यूज म्हणजे काय ?

काही उमेदवार, राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये वर्तमानपत्रामधील बातम्यांच्या स्वरुपात आपली जाहिरात करतात. या जाहिरातीचे दृश्य स्वरुप जरी बातमीसारखे असले तराही प्रत्यक्षात प्रसार माध्यमांना किंमत देऊन अशा बातम्या छापून आणल्या जातात. उदा.-

(अ) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक असलेल्या क्षेत्रात प्रसिध्द होणा-या / वितरित होणा-या वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या बातम्या विशिष्ट पक्षाशी अथवा उमेदवाराशी संबंधित असून त्याची वारंवारता फार जास्त असते.

(ब) एखादया प्रसार माध्यमामार्फत विशिष्ट पक्षाची अथवा उमेदवाराची प्रचार सभा, भाषण अथवा इतर कार्यक्रम ज्यांना अवास्तव प्रसिध्दी देण्यात येते.

**७. पेड न्यूजच्या संदर्भात समिती पुढीलप्रमाणे कार्यवाही करेल :-**

(१) राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर केल्यावर सदर समिती एक वार्ताहर परिषद घेऊन तसेच वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना देऊन निवडणुकांमध्ये होणा-या पेड न्यूज म्हणजे काय याची माहिती सर्व संबंधितांना देईल. तसेच अशाप्रकारे पेड न्यूजबाबत आलेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्याकरिता जाहिरात समितीचे गठन केलेले आहे हे सर्वांच्या निदर्शनास आणेल.

(२) सदर समिती संबंधित जिल्हयात प्रसिध्द होणा-या / वितरित होणा-या वृत्तपत्रांमध्ये पेड न्यूज यामध्ये मोडणाऱ्या बातम्या निवडणुकीच्या कालावधीत प्रसिध्द होत आहेत यासंदर्भात तक्रार आल्यास अश्या तक्रारींच्या अनुषंगाने त्या पेड न्यूज या सदराखाली मोडतात किंवा कसे याची निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत छाननी करेल.

(३) एखादी राजकीय जाहिरात / उमेदवाराची बातमी पेड न्यूजच्या स्वरुपात असल्याचे समितीचे मत झाल्यास या बातमीवर, जाहिरातीवर झालेला खर्च उमेदवारांच्या खर्चात का समाविष्ट करण्यात येऊ नये अशी नोटीस संबंधित पक्ष / उमेदवार यांना देईल.

(४) या समितीकडे संबंधित पक्ष, उमेदवार तसेच प्रसार माध्यम यांनी आपली बाजू लेखी स्वरुपात मांडल्यानंतर समिती यासंदर्भात अंतिम निर्णय घेईल.

(५) एखादी बातमी पेड न्यूज आहे असे समितीचे मत झाल्यास या पेड न्यूजवर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यांना कळवेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति :-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

G:\ab-ele.comm.of india.doc